171

# DR. BABASAHEB AMBEDKAR MARATHWADA UNIVERSITY, AURANGABAD.

## Adult, Continuing Education and Extension Services Centre

# विक्री प्रतिनिधी अभ्यासक्रम

# PROSPECTUS

Please Contact for more details to :-

"Adult, Continuing Education and Extension Services Centre."

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University, Aurangabad.

| | | |
|---|---|---|
| Office Phone No. | : | (0240) 334431 - 37 |
| Extension | : | 373 and 383 |
| Residential | : | (0240) 325372 |


**Value Rs. 25/-**

विद्यार्थी मित्रहो,

वाढत्या बेकारीमुळे किंवा सेवेत असूनही आपल्याजवळ कौशल्य नसल्याने हतबल होण्याचे कारण नाही. आपल्या उद्याच्या उज्ज्वल भविष्याकरिता विद्यापीठाच्या प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार सेवा केन्द्राच्यावतीने निरंतर शिक्षणाचे अभ्यासक्रम तयार केलेले आहेत. ह्या अभ्यासक्रमाव्दारे आपणांस स्वतःचा उद्योग व्यवसाय करता येईल, नोकरीच्या संधी प्राप्त होतील. सेवेत असाल तर कौशल्य प्राप्त झाल्याने बढतीच्या संधी प्राप्त होऊ शकतील.

सदर अभ्यासक्रम हे विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार असून त्यास विद्या परिषदेची व व्यवस्थापन परिषदेची मंजूरी आहे.

म्हणून हा अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केल्यानंतर आपणांस विद्यापीठाचे प्रमाणपत्र मिळेल. आपले जीवनमान निश्चितच उंचावेल व देशाच्या प्रगतीमध्ये आपले योगदान लाभेल यात मुळीच शंका नाही.

अधिक माहितीकरिता आमच्या विभागाशी संपर्क साधावा.

संचालक

(प्रौ. नि. शि. वि. केन्द्र)

# विक्री प्रतिनिधी प्रशिक्षण अभ्यासक्रम

औरंगाबाद शहराचे ऐतिहासिक महत्व आणि औद्योगिकरणात झपाट्याने होणारी वाढ लक्षात घेतली तर येथे अनेक विविध प्रकारच्या वस्तुंची निर्मिती होत आहे. त्या वस्तुंना बाजारपेठही आहे. आवश्यकता आहे त्या वस्तुंची कौशल्याने विक्री करणाऱ्या प्रतिनिधींची. असे कुशल संभाषण चतुर प्रतिनिधी निर्मिती आपण सेल्समनशीप ट्रेनिंग कोर्सच्या अभ्यासक्रमातून करु शकतो.

सध्याच्या बेकारीचा विचार करता, अनेक तरुण कामाच्या शोधात आहेत. पण कोणते काम करावे यासंबंधी त्यांच्या दिशा स्पष्ट नाहीत. या अभ्यासक्रमातून त्यांना दिशा मिळून हाताला काम आणि पोटाला भाकर मिळू शकेल. त्यासाठी दोन महिन्याचा विक्री प्रतिनिधीच्या अभ्यासक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे.

**अभ्यासक्रम – विक्री कलेची तत्वे** गुण १००

विक्री व्यवस्थापनाची उत्क्रांती.

विक्रेत्याचा उदय व विकास.

विक्री व्यवस्थापनाचा अर्थ - व्याख्या - व्याप्ती.

वस्तु विषयक ज्ञान.

ग्राहकाविषयी ज्ञान - त्यांची मानसिकता.

विक्रीकला - कला की शास्त्र.

ग्राहक संशोधन - ग्राहकाचे स्वागत.

वस्तु दाखविणे - वस्तुंचे प्रात्यक्षिक.

ग्राहकांच्या शंका - त्यांचे समाधान.

वस्तुंची जाहिरात - जाहिरातीचे महत्व.

जाहिरातीची माध्यमे.

विक्रेत्याचे प्रशिक्षण - महत्व - आवश्यकता.

प्रात्यक्षिक गुण १००

गट चर्चा - शोरुम ला भेटी.

पत्र व्यवहार - सजावट.

दुकानात प्रत्यक्ष विक्री.

**वर्गात वस्तु विक्रीची प्रात्यक्षिके.**

विद्यार्थी संख्या - ५०

कालावधी - दोन महिने.

शैक्षणिक शुल्क - ५०० रुपये.

प्रवेश पात्रता - किमान मॅट्रीक.

सहकार्य - कॉमर्स विभाग, अर्थशास्त्र विभाग.

———(०)———



## विद्यार्थ्यांना सूचना

१) प्रवेश अर्ज व माहितीपुस्तिका नीट वाचा. अर्जात नाव, पत्ता, इत्यादी माहिती पूर्ण, अचूक, स्वत:च्या सुवाच्य अक्षरात लिहा.

२) प्रवेश अर्जासोबत आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणित सत्यप्रती जोडा. मूळ दाखले जोडू नका.

३) दिलेल्या मुदतीत प्रवेश अर्ज सादर करावा व त्याची पोच घ्यावी.

४) विहित मुदतीत आपल्याला प्रवेशासंबंधीचे पत्र पाठविले जाईल व अभ्यास केन्द्रावरही प्रवेश यादी लावण्यात येईल. जर आपल्याला प्रवेशाचे पत्र घोषित केलेल्या मुदतीत मिळाले नाही तर प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार केन्द्राशी संपर्क साधावा.

५) प्रवेश यादी जाहीर झाल्यानंतर प्रवेश शुल्क आपण दिलेल्या मुदतीत भरावयाचे आहे. मुदतीत शुल्क प्राप्त झाले नाही तर आपला प्रवेश रद्द होईल. प्रवेश रद्द झाल्यास कोणतेही शुल्क परत केले जाणार नाही व प्रतीक्षा यादीतील पुढील विद्यार्थ्यांस प्रवेश देण्यात येईल.

६) प्रवेश कायम झाल्यानंतर काही अपरिहार्य कारणांनी विद्यार्थ्यांस प्रवेश रद्द करावयाचा असेल तर त्यास भरलेल्या शुल्काचा परतावा मिळणार नाही.

७) कोणत्याही सामाजिक/आर्थिक गटातील विद्यार्थ्यांना शुल्कामध्ये सवलत मिळणार नाही.

८) आपला प्रवेश कायम झाल्यानंतर आपण प्रौढ, निरंतर शिक्षण आणि विस्तार केन्द्राशी संपर्क साधून अध्ययन साहित्य, ओळखपत्र न्यावे. ओळखपत्रावर केन्द्र प्रमुख/केन्द्र संयोजकांची स्वाक्षरी घ्यावी.

९) अभ्यास केन्द्रावर येतांना तसेच परीक्षेच्या वेळी ओळखपत्र जवळ असणे आवश्यक आहे.

१०) विद्यापीठाने ठरविलेल्या परीक्षा केन्द्रावर विद्यार्थ्यांस परीक्षा देणे बंधनकारक राहील.

११) अभ्यासकेन्द्राच्या कार्यालयीन वेळेतच केन्द्र संयोजकांशी संपर्क साधावा.

१२) विद्यापीठ व केन्द्राच्या कार्यालयीन वेळा सकाळी १०-२० ते सायं. ६-०० वाजेपर्यन्त राहील.

१३) सदर अभ्यासक्रमास ७५% उपस्थिती अनिवार्य आहे. त्याशिवाय परीक्षेस बसता येणार नाही.

———(०)———

**I Core Staff :-**

1) Shri Ashokrao Hajare : Director.
2) Shri G. T. Degaonkar : Asstt. Director.
3) Shri N. D. Kamble : Project Officer.
4) Shri K. N. Dhabe : Project Officer.
5) Shri S. S. Bainade : Project Officer.

**II Supporting Staff :-**

1) Shri Z. A. Razvi : Account Assistant.
2) Smt. C. A. Warade : Sr. Asstt.
3) Smt. S. P. Deshpande : Steno Typist.
4) Shri S. B. Kharat : Jr. Asstt.

Dr.BAMUP 68/4/2000-300 Copies